**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

# प्रेसनोट दिनांक – ३१/०३/२०२४

**दि. ३०/०३/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ३९० /२०२४ भादंवि कलम ३०७,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. २९/०३/२०२४ रोजी २०.३० वा चे सुमा. ऑक्सिकेअर हॉस्पीटल समोर, भारतमाता चौक, काळेवाडी, पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि. ३०/०३/२०२४ रोजी ०३/३० वा. |
| फिर्यादी | :- | अक्षय अनिल सरवदे वय २८ वर्षे धंदा- नोकरी रा. सर्व्हे नं. ७८/१/११ तुळजाभवानी कॉलनी, कोकणेनगर, काळेवाडी, पुणे. |
| आरोपी | :- | १. शंतनु शिंदे वय अंदाजे २२ वर्षे<br>२. सतिष ऊर्फ बंडा सगर वय अंदाजे ३० वर्षे रा. काळेवाडी पुणे.<br>**आरोपी क्रं १ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व फिर्यादीचा मित्र मोहित संजय सनेर असे दोघेजन भारतमाता चौक, काळेवाडी येथुन काळेवाडी गांवठाणकडे जात असताना ऑक्सीकेअर हॉस्पीटल समोर आलो असता त्या ठिकाणी फिर्यादीचे ओळखीचे इसम आरोपी क्रं १ व २ असे दोघेजन फिर्यादी यांचे जवळ आले व त्यांनी फिर्यादीस काहीएक कारण नसताना शिवीगाळी करुन हाताने मारहान करु लागले, त्यावेळी फिर्यादीचे सोबतचा मित्र मोहित मध्ये पडला असता त्यालाही आरोपी मजकुर यांनी हाताने मारहान केली. त्याचवेळी आरोपी क्रं १ याने त्याठिकाणीच पडलेला छोटा लोखंडी रॉड घेऊन “थांब तुला खल्लासच करतो” असे म्हणुन रॉड फिर्यादीचे डोक्यात जोरात मारुन फिर्यादीस जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | निलेश नलावडे, सहा.पोलीस निरीक्षक ९५५२५२०१९३ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे १९६/२०२४ भा. द. वि. कलम ३२३,३४१, ३८४,३८५, ३८६,४२७, ३४ म.पो.का.३७ (१),१३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.३०/०३/२०२४ रोजी संध्या ०५/३० वा सुमारास मी सोमाटणे टोलनाका पास करुन शिरगाव फाटा क्रॉस करीत असताना रस्त्याचे डाव्या बाजुला |
| गुन्हा दाखल | :- | दि.३०/०३/२०२४ रोजी २३/५८ वा |
| फिर्यादी | :- | राहुल लक्ष्मण बो-हाडे ,वय २८ वर्षे ,धंदा ट्रक डायव्हर ,रा धामनगाव ,ता आष्टी ,जि बिड |
| आरोपी | :- | ओनम भाई व त्याचा मित्र<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे टोलनाका पास करुन शिरगाव फाटा क्रॉस करीत असताना नमुद आरोपी व त्याचा साथीदार याने मिळुन फिर्यादीचा रस्ता आडवुन फिर्यादीकडे हद्दीतुन ये जा करण्यासाठी प्रत्येक ट्रीपला २०००/- रु हप्ता खंडणी म्हणुन मागत जर खंडणी दिली नाही तर हात मोडुन संपवुन टाकण्याची धमकी देत पैशाची मागणी केली व फिर्यादीला दगड मारुन मुक्कामार होणेस नमुद आरोपी याचा साथीदार यांनी फिर्यादीला जखमी करुन फिर्यादीकडे खंडणी मागुन लोखंडी रॉडने फिर्यादीचे गाडीचे नुकसान केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि खामगळ ९५६१०६५८८१ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी १२३/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. २६/०३/२०२४ रोजी १८/०५ ते २१/१२व दि ३०/०३/२०२४ रोजी सकाळी १२/०० ते १२/४५ वा.चेदरम्यान,बाबुरावजीघोलप महाविदयालय सांगवी पुणे येथील अर्थशास्त्र विभाग येथे लोकसेविका डॉ.शकुंतला निवृत्ती माने यांचेकक्षात |
| गुन्हा दाखल | :- | दि.३०/०३/२०२४ रोजी१९/५५ वा |
| फिर्यादी | :- | दिपक बाबजी पावडे वय ४० वर्षे व्यवसाय –नोकरी असिस्टंड प्रोफेसररा.श्रीकृष्ण कॉलणीथेरगाव फाटा, पुणे |
| आरोपी | :- | महीला आरोपी |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी ,बाबुरावजी घोलप महाविदयालय सांगवी पुणे येथील अर्थशास्त्र विभाग येथे लोक सेविका डॉ.शकुंतला निवृत्ती माने यांचे कक्षात फिर्यादी सुधारणा करून आणलेल्या प्रबंधास अँप्रुव्हल देवुन पुढे पाठविण्याकरीता साविञी बाई फुले पुणे विदयापीठ यांनी फिर्यादीचे पी.एच.डी करीता नेमलेल्या मार्गदर्शिका लोकसेविका डॉ शकुंतला निवृत्ती माने वय ५९ वर्ष पद–प्रोफेसर अर्थशास्त्र विभाग बाबुरावजी घोलप महाविद्यालय सांगवी पुणे रा. सर्वेनं १२५ शिवशक्ती निवास कोथरूड् पुणे यांनी दिनांक २६/०३/२०२४ रोजी मागणी केलेल्या २५०००/- रूपयांपैकी प्रथम २००००/- रूपये लाच रकमेची पंचांसमक्ष मागणी करून ती लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन स्वीकारली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोलीस उप-अधीक्षक श्री.सुदाम पाचोरकर अँ.क. ब्यु पुणे |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ३९१ /२०२४ भादंवि कलम ३०८,३२३, ५०४,५०६,३४ क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ ,३ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. २९/०३/२०२४ रोजी २०.३० वा चे सुमा. ऑक्सिकेअर हॉस्पीटल समोर, भारतमाता चौक, काळेवाडी, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि ३०/०३/२०२४ रोजी ०३/४९ वा |
| फिर्यादी | :- | शंतनु विजय शिंदे वय १९ वर्षे धंदा- नोकरी रा. कैलास बारणे यांची चाळ, साईनाथ कॉलनी, कैलासनगर थेरगांव, पुणे. मुळगांव- मु.पो. हाडशी ता. मावळ, पुणे. |
| आरोपी | :- | १) अक्षय अनिल सरवदे वय २८ वर्षे धंदा- नोकरी रा. सर्व्हे नं. ७८/१/११ तुळजाभवानी कॉलनी, कोकणेनगर, काळेवाडी, पुणे.<br>२) मोहित संजय सनेर वय २८ वर्षे रा. काळेवाडी, पुणे.<br>**आरोपी अटक आहेत** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी तसेच फिर्यादीचा मित्र सतिष ऊर्फ बंड्या सगर असे ऑक्सीकेअर हॉस्पीटल समोर थांबलेले असताना त्या ठिकाणी फिर्यादीचे ओळखीचे इसम आरोपी क्रं १ व २ असे दोघेजन त्याठिकाणी आले व फिर्यादी यांचेकडे रागारागाने पाहत होते. त्यावेळी बंड्या सगर याने आरोपी क्रं १ यास काय बघतोस, असे विचारले असता आरोपी क्रं १ याने आमचेकडे पाहुन तुम्हाला खुप माज आला आहे, तुम्हाला बघुन घेईल मी पोलीसांचा खबरी आहे, असे म्हणाला असता फिर्यादीने त्यास जाऊदे भाऊ सोडुन दे विषय असे म्हणाले असता आरोपी मजकुर यांनी फिर्यादीस शिवीगाळी करुन, हाताने मारहान केली. त्याचवेळी आरोपी क्रं १ याने त्याचे हातातील छोटा पाना फिर्यादीचे डोक्यात जोरात मारला. त्यावेळी सतिष ऊर्फ बंड्या सगर हा त्यांना समजाऊन सांगत असतानाच आरोपी क्रं १ याने आम्हाला पुन्हा हाताने मारहान करुन तुम्हाला खुप माज आला आहे, आता तुम्हाला खल्लासच करतो असे म्हणुन आरोपी क्रं १ याने त्याचे हातातील पाना फिर्यादीस फेकुन मारुन त्या ठिकाणी पडलेला मोठा दगड उचलला व बंड्या सगर याचे डोक्यात मारला. परंतु तो वार त्याने चुकविला व बाजुला पळाला. फिर्यादी व त्यांचा मित्र बंडया सगर घाबरुन व भितीने तेथुन पळुन गेले. फिर्यादी व बंडया पळुन जाताना अरोपी मजकुर यांनी आमचेकडे पाहुन आम्हाला शिव्या देत तेथील येणा-या जाणा-या लोकांना हातात दगड घेऊन धमकी देत मी इथला भाई आहे, असे म्हणून शिवीगाळ करत कोण त्यांना वाचवतो ते पाहतोच. असे मोठमोठ्याने म्हणत होता. आरोपी क्रं १ याने बंड्या सगर यास केलेल्या दगडाचे वारामुळे त्याचा जीव जाऊ शकतो, याची त्याला जाणीव असताना ही आरोपी क्रं १ याने मोठा दगड घेऊन त्याचे डोक्यात वार केला. तसेच त्या दोघांनी मिळुन शिवीगाळी करुन हाताने मारहान केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | निलेश नलावडे, सहा.पोलीस निरीक्षक ९५५२५२०१९३ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण २१२/२०२४ भादवी ३५३,३३६, ५०४,५०६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ३०/०३/२०२४ रोजी १६/०० वा.मुटकेवाडी, षिक्षक कॉलनी, साई निवास बिल्डींग , चाकण, ता.खेड, जि. पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि ३०/०३/२०२४ रोजी १८/३० वा |
| फिर्यादी | :- | वैजनाथ रामा इबतवार,वय ३७ वर्षे, धंदा- नोकरी (महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी), राहणार- फ्लॅट नं. ७०७, सातवा माळा, प्रज्ञेश रेसिडेन्सी, झगडेवस्ती, पुणे- नाशिक रोड, चाकण, ता. खेड जि. पुणे |
| आरोपी | :- | अनिकेत पंढरीनाथ येलवंडे रा. मुटकेवाडी, षिक्षक कॉलनी, साई निवास बिल्डींग , चाकण, ता.खेड, जि. पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे महावितरण कंपनी नगरपरिषद पाखा येथे आले असता महावितरण चाकण चे शाखा अभियंता अविनाश सावंत यांनी फिर्यादी यांस वीजबील थकबाकी यादी दिली व सदर यादीतील वीजग्राहक यांची वीजबील भरणा करून घेणे किंवा ती खंडीत करणेबाबत सुचना दिले. फिर्यादी व त्यांचेसोबत चैतन्य लक्ष्मण शंकर असे दोघे दिलेल्या यादीप्रमाणे कामकाज दिवसभर केले. सायं ०४.०० वाजताच्या सुमारास यादीतील आरोपी यांचे येथे येवुन त्यांना वीजबील भरण्याबाबत सांगितले असता त्याने पैसे आले नसल्याचे सांगितले. फिर्यादी यांनी यापुर्वी त्याचे वीजबील न भरल्यामुळे कनेक्शन कट केलेले होते परंतु आम्ही त्यांचे वीज घरामध्ये असल्याचे दिसुन आल्याने आम्ही त्यांचा मीटर बॉक्स चेक केला असता त्यांनी त्यांचे किराणा दुकान व एच डी एफ सी चे एटीएम मधील मीटर बॉक्स मधुन वीज घेतल्याचे फिर्यादी यांचे निदर्शनास आले. त्यावेळी फिर्यादी यांनी सदरची माहिती शाखा अभियांता अविनाश सावंत यांना दिली असता त्यांनी सदर इसमाचे पोल वरून कनेक्शन कट करण्यास सांगितले. त्यावेळी फिर्यादी व चैतन्य लक्ष्मण शंकरे यास पोल वर चढण्यास सांगितले असता तो पोलवर जावुन कनेक्शन कट करत असताना त्याठिकाणी आरोपी आला व बोलला की, माझे डोक्यात जावु नका, घायगाल्या माझे कनेक्शन कट करू नका नाहीतर तुम्हांला गाडीखाली घालुन तुकडे करतो असे बोलुन त्याने खाली पडलेला मोठा दगड उचलुन चैतन्य शंकरे याचे दिशेने फेकुन मारला असता तो दगड चैतन्य याने हुकवला. त्यांनतर फिर्यादी यांनी त्यांचे मोबाईलने रेकॉर्डीग करण्यास सुरूवात केली असता तो फिर्यादी यांचे जवळ आला व फिर्यादी यांचा मोबाईल हिसकवण्याचा प्रयत्न केला, तसेच फिर्यादी यांना हाताने मारहाण व धक्काबुक्की केली. तसेच त्याने माझी जर पोलीस स्टेशनला तक्रार केली तर तुकडे करीन असे बोलुन तेथुन निघुन गेला |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा हांडे ९९२१५२२४८८ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ४०१/२०२४ भादंवि कलम ३२४,३२३ ,१४३,१४६,<br>१४९ व महा.पो.अधि.कलम ३७ (१) (३) सह १३५ क्रिमीनल लॉ अमेडमेट ॲक्ट ७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.३०/०३/२०२४ रोजी १४.०० वा.चे अक्षय भरणे यांचे रुमवर भाडयाने भरणे वस्ती मान मुळ रा पवनानगर रोड कडदे मावळ जि पुणे चे घरासमोर |
| गुन्हा दाखल | :- | दि.३०/०३/२०२४ रोजी २२.३४ वा |
| फिर्यादी | :- | साहील बाळासाहेब देशमुख वय १९ धंदा शिक्षण रा अक्षय भरणे यांचे रुमवर भाडयाने भरणे वस्ती मान रा पवनानगर रोड कडदे मावळ जि पुणे |
| आरोपी | :- | १) विशाल काकडे रा माण पुर्ण नाव पत्ता माहीत नाही<br>२) नागेश पुर्ण नाव पत्ता माहीत नाही<br>३) इतर अनोळखी ४ ते ५ ईसम<br>**आरोपी अटक नाहीत** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी १ ते ३ व इतर ३ ते ४ इसमांनी फिर्यादीला तु कॉलेज मध्ये कोणत्या मुलीस काय बोलला असे म्हणुन लाथाबुक्याने मारहान करुन आरोपी क्र.१ याने फिर्यादीला |

फिर्यादीचे घरासमोर पडलेला प्लॅस्टीकचा पाईपने फिर्यादीचे पाठीत मारहाण करुन दुखापत केली व लाथा बुक्याने मारहाण करुन " याला लय माज आहे याला मारा "असे म्हणुन शिविगाळ केली व मोठमोठयाने आरडाओरडा करुन सार्वजनिक ठिकाणी दहशत माजविली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि पांचाळ ८९२८३७६१००

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- भोसरी एमआयडीसी १६१/२०२४ भा.द.वि.कलम भा.द.वि.कलम २७९,३३७,३३८,४२७ सह मोवाका कलम ११९/१७७, १८४,१३४ (अ)(ब) प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२९/०३/२०२४ रोजी ११.०० वा सुमारास
केएसबी चौकाकडून भोसरीकडे येणा-या २०० मीटर अंतरावर असलेल्या सार्वजनिक रोडवर पुणे

गुन्हा दाखल :- दि.३०/०३/२०२४ रोजी २३/०८ वा.

फिर्यादी :- निखिल श्रीनिवास पंडित वय ४५ वर्षे धंदा-व्यवसाय, रा.सुखवाणी कँम्पस सोसायटी वॉटर लीली. डी विंग फ्लॅट नं.१५,वल्लभनगर पिंपरी पुणे

आरोपी :- अज्ञात फोर व्हीलर
वरील चालक

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्याचा मित्र अमित मधुकर वेदांते हे त्यांचे मोटार सायकल क्रमांक एमएच ४६ एम ४९४५ हिचेवरुन फॅब्रिकेशनचे साहित्य घेण्यासाठी बालाजीनगर टेल्कोरोड एमआयडीसी भोसरी पुणे येथे केएसबी चौक टेल्कोरोड मार्गे भोसरी रोडने जात असताना टाटामोटर्स कंपनी मेनगेटच्या अलीकडे २०० मीटर अंतरावर सार्वजनिक रोडवर एका अज्ञात फोर व्हीलर गाडीवरील चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, बेजबाबदारपणे व वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगाने चालवुन फिर्यादी यांचे गाडीस मागील बाजूने जोराची धडक देवुन फिर्यादीचे डाव्या खांद्याला,डाव्या गुडघ्याला डाव्या कानाच्यावर डोक्याला जखम करुन मानेच्या डाव्या बाजूकडील हाड(कॉलर बोन) फ्रॅक्चर करणेस कारणीभुत झाला आहे.व त्याचा मित्र अमित यास डाव्या हाताच्या पंज्याला किरकोळ जखम केली,तसेच फिर्यादी यांच्या गाडीचे नुकसान करुन फिर्यादी यांना मदत न करता पळून गेला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि पठारे ८८८८८१०९५७

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी १९६/२०२४ भादवि कलम २८५ सह जीवनावश्यक वस्तु कायदा कलम ३ व ७प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.३०/०३/२०२४ रोजी १५/३० वाजताचे सुमारास बालाजी वजनकाटा जवळ, वाघजाईनगर ता खेड जि पुणे येथे पत्र्याचे शेडमध्ये

गुन्हा दाखल :- दि.३०/०३/२०२४ रोजी २२/ ५९वा.

फिर्यादी :- शरद शांताराम खैरे, पो.शि.ब.नं. २२७५, नेमणुक - महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय मो.नं. ८४८५८७२४८८

आरोपी :- प्रमय दिलीप घनरे वय २३ वर्षे, रा. खराबवाडी, ता. खेड जि. पुणे मुळ रा. घोटवडी पो. पाईट ता खेड जि. पुणे
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी याने ३,०००/- रुपये किंमतीचे १४ किलो वजणाच्या घरगुती वापराच्या सिलेंडर ज्वलनशिल पदार्थ असल्याचे माहीत असताना तसेच आजुबाजुचे परिसरात राहणारे लोकांचे जिवितास धोका निर्माण होईल हे माहीत असताना बिगरपरवाना घरगुती सिलेंडर बेकायदेशिर रित्या बाळगलेल्या अवस्थेत मिळुन आला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा राठोड ९८८१०९७७१९

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | आळंदी ९३/२०२४महा दारु अधि कलम ६५(फ) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ३०/३/२०२४ रोजी ११.००वा. चे सुमारांस कोयाळी गावचे हददीत भिवरेवाडी येथील रंगनाथ भिवरे यांचे पडीक शेत जमिनीमध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि.३०/३/२०२४ रोजी १८/२५ वा |
| फिर्यादी | :- | सुधिर शिवाजी दांगट, पोशि/२२७३, नेमणूक गुन्हे शाखा युनिट-३, |
| आरोपी | :- | महिला आरोपी |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील महिला आरोपी हिने बेकायदा गावठी हात भटटी साठी लागणारे अंदाजे १,०८,०००/- रु. चे ५,४०० लिटर कच्चे रसायण जवळ बाळगुन हातभटटीचे दारुची भटटी अनाधिकाराने, विनापरवाना, बेकायदेशीर लावली असताना आढळुन आली सदर महीला आरोपी हीचा सदर परीसरात शोध घेतला मिळून आली नाही |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोफौ टोके ९८२२९१४१९१ |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड १७३/२०२४ आर्म अँक्ट ३(२५), महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७ (१)(३) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.३०.०३.२०२४ रोजी १०.४५ वा.चे सुमारास श्रीकृष्ण मंदीरा जवळ एम.बी.देहुरोड पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.३०/०३/२०२४ रोजी २३.०३ वा |
| फिर्यादी | :- | स्वप्निल चंद्रकांत साबळे, वय-३२ वर्षे,पोशि २३७२ नेमणुक - देहुरोड पोलिस स्टेशन पिंपरी चिंचवड,.मो.नं.९८९००८६८८५ |
| आरोपी | :- | कुणाल सुभाषचंद्र वाल्मीकी ,वय-२९ वर्षे, रा. श्रीकृष्ण मंदीरा जवळ एम.बी.देहुरोड पुणे.<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी याने ५०,०००/- रु किमतीचे एक स्टीलचे पिस्टल व ५००/- रु की चे एक जिवंत काडतुस विनापरवाना, बेकायदेशिर स्वताच्या ताब्यात बाळगुन फिरत असतांना मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि राठोड ७०२८३८५८४१ |

११.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी १९५/२०२४ भादवि कलम २८५ प्रमाणेसह जीवनावश्यक वस्तु कायदा कलम ३ व ७प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ३०/०३/२०२४ रोजी १७/३० वाजताचे सुमारास ग्रामपंचायत खराबवाडी जवळ, खराबवाडी ता खेड जि पुणे येथे पत्र्याचे शेडमध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि. ३०/०३/२०२४ रोजी २२/५३ वा. |
| फिर्यादी | :- | राजेंद्र परमेश्वर खेडकर, पो.शि.ब.नं. २८००, नेमणुक - महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय मो.नं. ९६५७६८६२५१ |
| आरोपी | :- | किरण देविदास घोंगडे वय २४ वर्षे, रा. बंगलावस्ती ,खराबवाडी, ता. खेड जि. पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी याने ३,०००/- रुपये किंमतीचे १४ किलो वजणाच्या घरगुती वापराच्या सिलेंडर ज्वलनशिल पदार्थ असल्याचे माहीत असताना तसेच आजुबाजुचे परिसरात राहणारे लोकांचे जिवितास धोका निर्माण होईल हे माहीत असताना बिगरपरवाना घरगुती सिलेंडर बेकायदेशिर रित्या बाळगलेल्या अवस्थेत मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा राठोड ९८८१०९७७१९ |